**Publication:** Pudhari
**Date:** 28/08/2013
**Edition:** Pune
**Page No:** 2
**Headline:** Pune makes an entry in Smart Tech wizards

# 'स्मार्ट टेक विझार्ड्स' मध्ये पुण्याचा प्रवेश

**पुणे :** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) ने आयोजित केलेल्या 'आयटी विझ २०१३' या स्पर्धेच्या पुणे विभागातील स्पर्धेत दिवीज घोष आणि सुप्रिता रवीश हे फर्ग्युसन कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी विजेते ठरले. धनंजय कटकरंद आणि आयूष येबंरवार या शामराव कलमाडी प्रशालेचे विद्यार्थी उपविजेते ठरले. विजेती जोडी महाअंतिम फेरीत पुण्याचे प्रतिनिधीत्त्व करणार आहे. बर्कले टेक्नॉलाजी सेंटरचे प्रमुख इग्नाशिओ व्हेरा आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे पुण्याच्या डिलीव्हरी सेंटरचे प्रमुख अरविंद पाध्ये यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. यावेळी संवादात्मक ट्विटर स्पर्धाही आयोजित करण्यात आली होती. विभागीय अंतिम फेऱ्यांमध्ये १५०४ इतक्या ट्विट्सची नोंदणी करण्यात आली. यावर्षी स्पर्धेच्या प्रादेशिक फेऱ्या हैद्राबाद, अहमदाबाद, कोलकाता, बंगळुरू, चेन्नई आदि १४ शहरांमध्ये होणार आहेत.

